# नगराध्यक्षपदासाठी चारूशिला घरत यांचा एकमेव अर्ज दाखल

पनवेल(प्रतिनिधी) पनवेल नगर परिषदेच्या विद्यमान नगराध्यक्षा चारूशिला घरत यांनी नगराध्यक्षपाच्या निवडणुकीसाठी आज उपविभागीय अधिकारी व पनवेल नगरपालिकेचे प्रभारी मुख्याधिकारी सुदाम परदेशी यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या निवडणुकीसाठी एकच अर्ज दाखल झाल्यामुळे ही निवडणुक बिनविरोधत होत असल्याने कॉंग्रेसच्या चारूशिला घरतच पुन्हा नगराध्यक्षपदी विराजमान होणार आहेत.अर्ज दाखल करताना कॉंग्रेसचे गटनेते अनिल भगत, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, नगरसेविका निर्मला म्हात्रे, अलका भगत तसेच उपमुख्याधिकारी भगवान खाडे उपस्थित होते.

येत्या ऑक्टोंबरमध्ये विधानसभेची निवडणुक असल्याने अडीच वर्षाचा कार्यकाल संपलेल्या नगरपरिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष यांच्या निवडणुकांना शासनाने मुदतवाढ दिली होती. तथपि कायद्यात सुधारणा करून शासनाने मुदत ५ जुलै रोजी संपुष्टात आणली. त्यामुळे रायगड जिल्हयातील नगरपरिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका येत्या १८ जुलैला घेण्यात याव्यात असे आदेश जिल्हाधिकारी सुमंत भांगे यांनी दिले आहेत. अर्ज दाखल करण्याचा शेवटचा होता. वैध नामनिर्देशन पत्राची यादी सूचना फलकावर १६ जुलै रोजी सायंकाळी ५ नंतर प्रसिध्द होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारिख १७ जुलै सायंकाळी ४ वाजेपर्यंत असून अंतिम यादी त्याचदिवशी सायंकाळी ४ वाजल्यानंतर प्रसिध्द करण्यात येणार आहे. निवडणुक सभा १८ जुलै रोजी दुपारी १ वाजता होईल. उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी निवडणूक प्रक्रिया १८ जुलै रोजीच होईल.

पनवेल नगरपालिकेत सध्या कॉंग्रेस पक्षाचे २१, शेकाप, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आरपीआय महायतीचे १७ तसेच 0४ स्विकृत नगरसेवक असे पक्षीय बलाबल आहे. पनवेल नगरपरिषदेतील नगराध्यक्षपादासाठी ओबीसी महिला आरक्षण आहे. शुक्रवारी दिवसअखेर विद्यमान नगराध्यक्षा चारूशिला घरत यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्यामुळे त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून नगराध्यक्षपदाच्या घोषणेची औपारिकताच फक्त बाकी आहे.